# बातमीपत्र
# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि २२ जुलै २०२३

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४८६/२०२३ भादवि ४२०,४७१,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २५/१२/२०२२ रोजी ते आजतागायत घरनं १०८,मोदीखाना सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २१/०७/२०२३ रोजी १९.५६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | राजेश सिद्रामप्पा पाटील वय-४७ वर्षे,रा- सुदिप कॉम्पेलेक्स होटगीरोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सुभाष रंगनाथ लोहार,२) भुषण सुभाष लोहार,३) रत्नकुमार सुभाष लोहार रा- सोलापूर |
| **फसवणुक रक्कम** | | २५ लाख रूपये. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी यांचे सिध्देश्वर इंटरप्रायझेस या नावाचे फर्म असून त्याचे कार्यालय ५४३,दक्षिण कसबा येथे आहे, फिर्यादीचे मित्र गुरूनाथ येलेटी यांचे ओळखीचे वरील आरोपीत यांची शिवाजी नगर बाळे तालुका उत्तर सोलापूर येथील सिटी सर्व्हे नं ७३/२ क्षेत्र ११ हेक्टर ५७ आर ही जमीन विक्री करीता काढल्याचे सांगितल्याने फिर्यादीस जागेची आवश्यकता असल्याने फिर्यादीने सदर जागेबाबत मित्र येलेटी यांना विचारपूस करण्यास सांगितली.तेव्हा फिर्यादी व फिर्यादीचा मित्र व वरील आरोपीत यांनी मिळून वरील ठिकाणी सदर जागेबाबत व्यवहार करून सदर जागेचे १२ कोटी असा व्यवहार ठरला असून आरोपीत यांनी सदर जागेच्या इसारा पोटी २५ लाख रूपये देण्याचे ठरविले .फिर्यादीने सदर वेळी १ लाख रूपये हे सर्वासमक्ष देऊन उरलेले २४ लाख रूपये युनियन बॅक मधून चेक व्दारे दिले आहे.<br>तरी वरील वेळी व ठिकाणी यातील शिवाजी नगर बाळे तालुका उत्तर सोलापूर येथील सिटी सर्व्हे नं ७३/२ क्षेत्र ११ हेक्टर ५७ आर या मिळकतीसंदर्भात वरील आरोपीत यांचे भाऊ राजेद्र लोहार व वरील आरोपीतात वाद चालू असून या संदर्भात राजेंद्र लोहार यांनी सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारी वरून आरसीसी नं ३०/२००२ अन्वयेचा दावा प्रलंबीत असताना सदरची माहिती वरील आरोपींतानी संगनमत करून फिर्यादीपासून जाणीवपुर्वक लपवून दि २५/१२/२०२२ रोजी घरनं १०८,मोदीखाना येथे वरील मिळकतीसंदर्भात व्यवहार करून फिर्यादीकडून इसारा पोटी २५ लाख रूपये घेतले व सदरची रक्कम फिर्यादी वारंवार मागणी करून देखील आजतागायत पर्यत फिर्यादीचे पैसे वापस दिले नाही म्हणून तपास:- पोह/८१५/आटुळे- ९८२३५६१५५६ |